विक्रीकर आयुक्त महाराष्ट्र राज्य
मुंबई यांचे कार्यालय, ८ वा मजला,
नवीन इमारत, विक्रीकर भवन,
माझगांव, मुंबई - ४०० ०१०.

संदर्भ: - १. कार्यालयीन आदेश क्र.-विविआ/२०१५/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/फेररचना/अपिले कार्यभार/प्र.क्र.७६, दि. १७/१२/२०१५.

२. कार्यालयीन आदेश क्र. विविआ/२०१५/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/फेररचना/अपिले कार्यभार/प्र.क्र.७६ दि. २८/११/२०१६

३. शुध्दीपत्रक क्र.-विविआ/२०१५/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/फेररचना/अपिले कार्यभार/प्र.क्र.७६ दि. ३०/११/२०१६.

४. कार्यालयीन आदेश क्र. विविआ/२०१५/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/फेररचना/अपिले कार्यभार/प्र.क्र.७६ दि. २१/१२/२०१६.

५. कार्यालयीन आदेश क्र.-विविआ/२०१५/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/फेररचना/अपिले कार्यभार/प्र.क्र.७६, दि.०५/०१/२०१७.

६. कार्यालयीन आदेश क्र.-विविआ/२०१५/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/फेररचना/अपिले कार्यभार/प्र.क्र.७६, दि. २८/०२/२०१७

## कार्यालयीन आदेश

क्र.-विविआ/२०१५/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/फेररचना/अपिले कार्यभार/प्र.क्र.७६, मुंबई दि. 28 APR 2017

**प्रस्तावना**

१. उपरोक्त संदर्भ क्र. २ मधिल आदेशान्वये बदललेल्या अपिल कार्यपध्दतीच्या संबंधात निर्देश देण्यात आले होते. त्या अनुषंगाने संदर्भ क्र. २ ते ६ मधिल आदेशांन्वये, वेळोवेळी मार्गदर्शनपर सुचना देण्यात आल्या आहेत. बदललेल्या अपिल कार्यपध्दती नुसार, व्यापाऱ्यांने अपिल दाखल केल्यानंतर, व्यापाऱ्यास सुनावणीची संधी देवून अंशत: भरणा रक्कम निश्चित करणे व त्या रकमेचा व्यापाऱ्याने भरणा केल्यानंतर स्थगिती आदेश जारी करण्यापर्यंतची कार्यवाही विक्रीकर सहआयुक्त / विक्रीकर उपआयुक्त यांनी करावयाची होती. तसेच स्थगिती आदेश जारी केल्यानंतर संदर्भ क्र. २ च्या आदेशातील परिच्छेद क्र. ३ मध्ये विषद केलेल्या अपिल कार्यवाही स्थानांतरण कार्यपध्दती नुसार कार्यवाही करुन ती अपिले संदर्भ क्र.१ दि. १७/१२/२०१५ च्या आदेशात नमुद केलेल्या विक्रीकर सहआयुक्त (अपिले) / विक्रीकर उपआयुक्त (अपिले) यांच्याकडे स्थानांतरीत करण्यात यावीत असे निर्देश देण्यात आले होते.

२. उपरोक्त संदर्भ क्र. २ मधिल आदेश निर्गमित करतेवेळी प्रथम अपिल प्राधिकाऱ्यांना, ज्या आदेशा विरुध्द् व्यापाऱ्याने अपिल दाखल केले आहे, तो आदेश रद्द (Set Aside) करुन ते प्रकरण निर्धारणा अधिकाऱ्याकडे परत पाठविण्याचे (Remand Back) अधिकार नव्हते.

३. महाराष्ट्र कर विषयक कायदे (कर बसविणे, सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम २०१७ ( सन २०१७चे विधानसभा विधेयक क्र. १८) अन्वये महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर कायदा २००५ च्या कलम २६ मध्ये सुधारणा करण्यात आली असून, त्यानुसार प्रथम अपिल प्राधिकाऱ्यांना, ज्या आदेशा विरुध्द् व्यापाऱ्याने अपिल दाखल केले आहे, तो आदेश रद्द (Set Aside) करुन ते प्रकरण निर्धारणा अधिकाऱ्याकडे परत पाठविण्याचे अधिकार

केले आहे, तो आदेश रद्द (Set Aside) करुन ते प्रकरण निर्धारणा अधिकाऱ्याकडे परत पाठविण्याचे अधिकार आता आहेत. या संदर्भात Trade Circular No. VAT/ AMD-२०१७/ २/ Adm-८ Trade Circular No. १ T of २०१७ Dt. २०/०४/२०१७ देखील जारी करण्यात आले आहे.

४. या पार्श्वभुमीचा विचार करुन व शासन निर्णय, क्रमांक विकवि-१२१६/प्र.क्र.४/वि.प्र.४, दि. २४/०१/२०१७ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन, खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

**आदेश**

महाराष्ट्र कर विषयक कायदे (कर बसविणे, सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम २०१७ ( सन २०१७चे विधानसभा विधेयक क्र. १८) अन्वये महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर कायदा २००५ च्या कलम २६ मध्ये करण्यात आलेली सुधारणा विचारात घेवून, अपिल प्राधिकाऱ्यांनी तसेच बदललेल्या अपिल कार्यपध्दतीनुसार ज्या विक्रीकर सहआयुक्त / विक्रीकर उपआयुक्त यांच्याकडे अपिले दाखल करण्यात आली आहे त्यांनी, आपल्याकडील प्रलंबीत अपिल प्रकरणांचा आढावा घ्यावा.

निर्धारणा आदेशाच्या विरोधातील ज्या अपिल प्रकरणांमध्ये, निर्धारणा आदेश पारित करतेवेळी जर व्यापारी निर्धारणा प्राधिकाऱ्यासमोर सुनावणीसाठी उपस्थित किंवा हजर राहीला नसेल, तर अशा प्रकरणांमध्ये, अपिल प्राधिकाऱ्यांनी व ज्या विक्रीकर सहआयुक्त / विक्रीकर उपआयुक्त यांच्याकडे अपिले दाखल करण्यात आली आहेत त्यांनी, महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर कायदा २००५ च्या कलम २६ मध्ये करण्यात आलेल्या सुधारित तरतुदीनुसार निर्धारणा आदेश रद्द करुन निर्धारणा अधिकाऱ्याकडे प्रकरण परत पाठविण्याबाबत निर्णय घ्यावा.

इतर अपिल प्रकरणांच्या बाबतीत, बदललेल्या अपिल कार्यपध्दतीनुसार ज्या विक्रीकर सहआयुक्त / विक्रीकर उपआयुक्त यांच्याकडे अपिले दाखल करण्यात आली आहे त्यांनी स्थगिती आदेश जारी करण्यापर्यंतची कार्यवाही करावी व स्थगिती आदेश जारी केल्यानंतर संदर्भ क्र. २ च्या आदेशातील परिच्छेद क्र. ३ मध्ये विषद केलेल्या अपिल कार्यवाही स्थानांतरण कार्यपध्दती नुसार ती अपिले संदर्भ क्र.१ दि. १७/१२/२०१५ च्या आदेशात नमुद केलेल्या विक्रीकर सहआयुक्त (अपिले) / विक्रीकर उपआयुक्त (अपिले) यांच्याकडे स्थानांतरीत करावीत.

**विक्रीकर आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

प्रत:-

१. विशेष विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. अपर पोलीस महासंचालक व मुख्य दक्षता अधिकारी, महाराष्ट्र राज्य मुंबई.
३. अप्पर विक्रीकर आयुक्त, मुंबई- १, २, ३, ४/ठाणे/नाशिक/कोल्हापुर/नागपुर/ठाणे.
४. सर्व विक्रीकर सहआयुक्त.
५. आयुक्तांच्या कार्यालयातील सर्व कार्यासने.
६. सर्व विक्रीकर उपायुक्त, सहायक विक्रीकर आयुक्त आणि विक्रीकर अधिकारी.
७. सर्व आस्थापना अधिकारी.
८. निवडनस्ती.
९. स्थळप्रत.